| | |
|---|---|
| | MAHARASHTRA STATE COUNCIL<br>FOR OCCUPATIONAL THERAPY & PHYSIOTHERAPY, MUMBAI<br>महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई<br>**St. George'sHospital, Behind C.S.T. Station, Ph. 22620408**<br>**Email ID-**otptcouncil@gmail.com www.mahaotandptcouncil.in |

जा.क्र.ओटीपीटी/परिषद/बैठक /२०२१/४०५६ दि. २५ / ०२ /२०२१

**वृत्तांकन टिपणी ( प्रेस नोट)**

**प्रति,**

सर्व माध्यम प्रतिंनिधी

**विषय: अनिता डोंगरे नागपुर यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्या च्या वृत्तांकनाबाबत**
**संदर्भ : नागपुर वृत्तपत्र व स्थानिक केबल चॅनेलद्वारे प्रसारित करण्यात आलेली बातमी.**

**जरीपटका पोलिस ठाणे, नागपुर** यांच्याद्वारे तिसरा मजला, अरमोर टॉवर, **समता नगर, नागपुर** येथील **अनिता डोंगरे वय ४०** या महिलेवर काही अनैतिक व्यवहारासाठी गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे समजते. संबंधित प्रकरणाचे वृत्तांकन करत असताना सदरील महिला ही फिजिओथेरपी केंद्र चालवत असल्याचे नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या परिषद कायद्याअंतर्गत तयार केलेल्या नोंदवही चे अवलोकन केले अशा नावाची कोणतीही व्यक्तिची फिजिओथेरपिस्ट म्हणून नोंदणी झाली नसल्याने **सदरील महिला फिजिओथेरपिस्ट नसल्याचे निष्पन्न झाले आहे**. तसेच प्रसारित झालेल्या बातम्यामध्ये **त्याठिकाणी फिजिओथेरपी केंद्राचा कोणताही बोर्ड लावण्यात आला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे** . **त्यामुळे सर्व माध्यम प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की सदरील प्रकरणाचे वृत्तांकन करताना सदरील महिलेचा फिजिओथेरपिस्ट म्हणून उल्लेख टाळावा**. सदरील व्यक्तीचा फिजिओथेरपीशी काहीही संबंध नसताना फिजिओथेरपी शाखेची बदनामी करून जनमानसात या वैद्यकीय शाखेबाबत गैरसमज पसरण्यात येवू नये व इतर महिला फिजिओथेरपिस्ट यांना या प्रकरणामुळे त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

**फिजिओथेरपी शाखेची बदनामी करणे, फिजिओथेरपिस्ट नसताना असल्याचे भासवणे, बेकायदेशीर पणे फिजिओथेरपी व्यवसाय करणे किंवा तसे भासवणे यासाठी महाराष्ट्र अधिनियम २००४ (२) मुख्य अधिनियम या परिषद कायद्याअंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया संबंधित पोलिस अधिकारी जरीपटका पोलिस ठाणे यांच्याशी चर्चा करून या परिषदेद्वारे सुरू केलेली आहे.** या बाबतचे वृत्तांकन आपल्या प्रसिद्ध वृत्तपत्र व चॅनेल द्वारे प्रसारित करावे ही विनंती. तसेच बोगस फिजिओथेरपी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची आपणास माहिति मिळाल्यास या कार्यालयास कळवावे. या प्रकरणी आपले योगदान आवश्यक आहे. धन्यवाद.

Sudeep Hiralal Kale

Digitally signed by Sudeep Hiralal Kale
Date: 2021.02.25 16:34:59 +05'30'

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई